# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

तार — EDUTECH E-mail desk16@dtemaharashtra.gov.in Internet http/www.dte.org.in

क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१७/६२

दिनांक : २४।३।२०१८

प्रति,

१) महसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय : शासकीय / निमशासकीय कार्यालयातील कर्मचारी / अधिकारी यांनी आठवडयातून एक वेळ खादीचे कपडे परीधान करणेबाबत...**

उपरोक्त विषयाबाबतचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३४-१७/आस्था-२, दिनांक ९.३.२०१७ पहावे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१४ जून, २०१६ च्या परिपत्रकान्वये, राज्यातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था इ. मधील अधिकारी / कर्मचारी यांना प्रत्येक आठवडयातून एक दिवस खादीचे कपडे परिधान करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. यासंदर्भात विधानसभा तारांकित प्रश्न क्र.८१०४८ अन्वये दि.१४ जून, २०१६ च्या परिपत्रकाकडे बहुतांशी कार्यालयानी दुर्लक्ष केले असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.

तरी, आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यामधील अधिकारी / कर्मचारी खादीचे कपडे परिधान करीत आहेत किंवा कसे याबाबतची पडताळणी करून त्याबाबतचा अहवाल या संचालनालयास तात्काळ पाठवावा जेणेकरून शासनास सादर करणे शक्य होईल.

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.

( अैनुल अत्तार )
निवेश कार्य अधिकारी.

पृ.क्र.विकाऔ/भांडार विभाग/२०१८/ १०९
दिनांक 10 JAN 2018

प्रति,
सर्व प्राचार्य / संचालक,
शासकीय / अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतने,
औषधनिर्माणशास्त्र व अभियांत्रिकी महाविद्यालये,
औरंगाबाद विभाग

उपरोक्त पत्रासोबत जोडलेल्या शासन परिपत्रकातील निर्देशांनुसार योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ पाठवावा. जेणेकरुन संचालनालयास पाठविणे शक्य होईल.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.

प्रत – प्रोग्रॅमर यांना देवुन कळविण्यात येते की, कार्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावे.

खादीची वस्त्रे परिधान करण्यास प्राधान्य देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण- २०१६ / प्र. क्र. ९८/ १८ (र. व का.)
मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ जून, २०१६

परिपत्रक :

खादी व ग्राम उद्योगाचा विकास होण्यासाठी केंद्र शासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. याच उपाययोजनांचा एक भाग म्हणून मा. केंद्रीय राज्यमंत्री, सूक्ष्म, लघु तसेच मध्यम उद्योग यांनी शासकीय कार्यालये, शासकीय / अशासकीय शैक्षणिक संस्था तसेच ज्या कार्यालयांमध्ये ड्रेस कोड आहे, अशा सर्व कार्यालयांमधील अधिकारी / कर्मचारी यांनी आठवड्यातील किमान एक दिवस खादीची वस्त्रे परिधान करावीत, असे आवाहन केले आहे.

२. खादी व ग्राम उद्योगाच्या विकासाच्या मिशनमध्ये हातभार लावणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. देशातील खादी व ग्राम उद्योगामध्ये अधिकाधिक स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी खादीचा जास्तीत जास्त वापर होणे आवश्यक आहे. याद्दष्टीने राज्यातील शासकीय /निमशासकीय कार्यालये, शासकीय / अशासकीय शैक्षणिक संस्था यामधील अधिकारी / कर्मचारी यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी प्रत्येक आठवड्यात एक दिवस खादीची वस्त्रे परिधान करण्यास प्राधान्य द्यावे. ज्या विभागांमध्ये अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी ड्रेस कोड लागू आहे, त्या विभागांनीसुद्धा पोशाखाचा किमान एक संच खादीमध्ये तयार करून घेण्यास विशेष प्रयत्न करावेत व सदर पोशाख प्रत्येक आठवड्यात एक दिवस प्राधान्याने परिधान करावा.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर सूचना त्यांचे नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांचे निदर्शनास आणाव्यात.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक २०१६०६१४१७१८३२२३०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr Prem Singh Meena

Digitally signed by Dr Prem Singh Meena
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b7ea6c0963c6e2968fa f5ee62acd8a913dd4de985b56a05084b7de776d9e00bb, cn=Dr Prem Singh Meena
Date: 2016.06.14 17:22:34 +05'30'

(डॉ. पी. एस. मीना)
अपर मुख्य सचिव (प्र. सु. र. व का.)

प्रति,

१) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,

३) मा. राज्यपालांचे सचिव ( ५ प्रती ),
४) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ( ५ प्रती ),
५) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
६) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
७) मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
८) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
९) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१०) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
११) प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
१२) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१५) मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१६) सर्व विभागीय आयुक्त,
१७) सर्व जिल्हाधिकारी,
१८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१९) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख /
२०) प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
२२) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२३) निवड नस्ती ( कार्यासन १८ ).